ISSN : 2393-8900
IMPACT FACTOR : 1.9152 (UIF)

# Historicity

International Research Journal


UGC APPROVED

VOLUME-IV JAN.2018

***SPECIAL ISSUE***

Theme

## Contemporary History and Research Methodology



# Interdisciplinary National Seminar

# Contemporary History and Research Methodology

6 Jan. 2018




**Chief Editor**
Dr. Sanjay Gaikwad (H.O.D)

**Editor**
Dr. R. N. Jadhav



Organized by

Solapur Itihas Sanshodhan Mandal, Solapur (MS)
&
Bharat Mahavidyalaya, Jeur (Cen. Rly) (Tal-Karmala, Dist-Solapur)

Historicity International Research Journal SPECIAL ISSUE ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Contemporary History and Research Methodology

# डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : एक अभ्यास (१८८८ - १९४९)

प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे (कुरुमकर)
महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.
(मोबा. ८२७५२६९१९९)

प्रस्तावना -
भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात, सशस्त्रक्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करुन ठेवावे, असे क्रांतिसंघटनकार्य गणेश, विनायक,
नारायण या तिघा सावरकरबंधूंनी केल्याचे इतिहासात नमूद झाले आहे. त्यापैकी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची अनेक
चरित्रे इंग्रजी, मराठी, हिंदी व अन्य काही भारतीय भाषांतून प्रकाशित झाली आहेत. वीर सावरकरांच्या हयातीतच त्यांची काही गाजलेली
आणि सविस्तर माहिती देणारी चरित्रे प्रकाशित झाली. त्यांच्या गुप्त कार्याप्रमाणेच प्रकट आणि विश्वविख्यात झालेल्या कार्याचा व्याप
प्रचंड होता. विनायक सावरकर यांचे धाकटे बंधू डॉ. नारायणराव दामोदर सावरकर यांचा जन्म २५ मे १८८८ मध्ये नाशिक जिल्हयात
भगूर येथे झाला. त्यांच्या राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, साहित्यिक चळवळींचा अभ्यास सदर संशोधनात केला आहे.
बालपणापासून वडील बंधूंच्या पावलावर पाऊल ठेवून 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेत ते सक्रिय झाले. वयाच्या केवळ
अठराव्या वर्षी 'नाशिक कट' खटल्यात सहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा त्यांना झाली. ग.दा.सावरकर आणि वि.दा.सावरकर
या दोघांमधील गुण त्यांनी आत्मसात केले. भावनोत्कट प्रभावी वक्ते, प्रतिभावंत लेखक, साहसी क्रांतिकारक, कुशल संघटक, धूर्त,
चतुर, गुप्त कार्यकर्ता, असीम त्यागी आणि प्रेम मनमिळावू स्वभावाचे सदानंदी नेते म्हणून नारायणरावांनी लौकिक मिळविला.
दोघे वडील बंधू काळेपाण्यावर गेल्यावर कोवळया वयातच तिघाही भावंडांच्या कुटुंबपोषणाचा, क्रांतिकार्याचा आणि स्वत:च्या
शिक्षणपूर्तीचा भार त्यांच्यावर पडला. क्रांतिकार्य करीत असतानाच कलकत्ता येथे डॉक्टरीचा शिक्षणक्रम पूर्ण केला. १९०९ साली
कर्णावती येथे व्हाईसरॉय लॉर्ड मिंटोवर फेकलेल्या बॉंबप्रकरणी संशयावरुन त्यांना अटक झाली, पुढे पुराव्याअभावी त्यांची सुटका
झाली. १९१२ मध्ये दिल्लीत लॉर्ड हार्डिजवर बॉंब फेकला गेला, त्या प्रकरणी नारायणरावांना संशयावरुन कलकत्ता येथे अटक झाली. पुढे
पुराव्याअभावी त्यांची सुटका झाली. १९१६ मध्ये डॉक्टरीचा शिक्षणक्रम पूर्ण करुन पुढे मुंबईत व्यवसाय सुरु केला. त्यानंतर राजकीय,
सामाजिक कार्य करीत असतानाच अंदमानला जन्मठेपेची शिक्षा भोगीत असलेल्या दोघा वडील बंधूंच्या सुटकेसाठी वैधानिक मार्गाने
अविश्रांत प्रयत्न केले. दि. १० जानेवारी १९२७ ते १० मे १९३० पर्यंत 'श्रध्दानंद' हे वृत्तपत्र संपादक संचालकाचे दायित्व पत्करुन
यशस्विरित्या चालविले. रत्नागिरीला स्थानबध्द असलेल्या वि.दा. सावरकरांचे लिखाण 'श्रध्दानंद' मधून प्रकाशित होत असे. दि. ३०
एप्रिल १९३० ला डॉ.नारायणराव निर्बंधभंगाच्या आंदोलनात पकडले गेले. त्यानंतर एका अंकानंतर 'श्रध्दानंद'चे प्रकाशन बंद पडले.
संपूर्ण मुक्त झाल्यावर वि.दा.सावरकरांनी हिंदुमहासभेचे संघटन महाराष्ट्रात प्रभावीरीतीने केले. डॉ. नारायणरावांनी राजकीय कार्याच्या
धकाधकीतही जमेल तितकी साहित्यसेवा केली. 'वसंत' या टोपण नावाने कविता लिहिल्या. १८५७ च्या क्रांतियुध्दाच्या पार्श्वभूमीवर
लिहिलेली 'मरण की लग्न' ही कादंबरी 'जातिहृदय' नावाखाली लिहिली. 'समाजरहस्य' नावाची कादंबरी तसेच 'जाईचा मंडप' ही
कादंबरी, सेनापती तात्या टोपे यांचे चरित्र 'हिंदूंचा विश्वविजयी इतिहास' इत्यादी त्यांचे साहित्य गाजले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मूळ
इंग्रजीत लिहिलेल्या 'हिंदुत्व' आणि 'हिंदुपदपादशाही' या महत्त्वाच्या ग्रंथांचा अनुवाद डॉ. नारायणरावांनी वयाच्या साठाव्या वर्षी दै.
'प्रभात' (पुणे) साठी लेख लिहित असतानाच अर्धांगवायुचा झटका येऊन ते बेशुध्द झाले. त्यातच त्यांचे दि. १९ ऑक्टोबर १९४९
ला निधन झाले.
सावरकरबंधू म्हटले की, आपल्या देशासाठी त्यांनीकाय त्याग केला. देशाकरिता, देशाच्या स्वातंत्र्याकरिता तिघाही सावरकरबंधूंनी
आपल्या वडिलांना मिळालेल्या जाहगिरीवर पाणी सोडले. वि.दा. सावरकर आणि त्यांचे मोठे बंधू गणेश दामोदर, डॉ. नारायण
दामोदर सावरकर यांच्यावर विशेष लेखन झाल्याचे आढळून येत नाही. सदर शोधनिबंधात डॉ. नारायण दामोदर सावरकर यांच्या
कार्याचा आढावा घेतला आहे.

**जीवन व चरित्र -**
डॉ. नारायण दामोदर सावरकर हे सर्वात लहान होते. त्यांचा जन्म २५ मे १८८८ साली नाशिक जिल्हयातील भगूर या गावी झाला.
१८९२ या वर्षी नाशिक शहरात (प्लेगची) महामारीची साथ आली नि त्यात त्यांच्या मातोश्री राधाबाईंचे निधन झाले. त्यांचे वडील
दामोदरपंतांनी या तिघा बंधूंचा सांभाळ केला. तेच त्या तिघांची आई झाले. त्यांच्या घरात शेजारची मुले येत असत. सावरकरांचे
पूर्वज पेशव्यांचे सरदार असल्यामुळे पूर्वजांची शस्त्रास्त्रे, धनुष्यबाण, गंजलेल्या तलवारी घरात पडून होत्या. ती शस्त्रे घेऊन ती मुले
लुटुपुटीची लढाई खेळत. शिवाजीमहाराज, झाशीची राणी, वासुदेव बळवंत फडके या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर परिणाम
झाला होता. थोडक्यात, लहानपणापासून त्यांच्यावर ऐतिहासिक पुरुषांचा प्रभाव पडला होता.
१८९६ साली महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला. दि. ५ नोव्हेंबर १८९९ साली प्लेगच्या साथीत डॉ. नारायणराव सावरकरांचे वडील
दामोदरपंत मृत्यू पावले. नारायणरावांनाही प्लेग झाला होता. परंतु त्यातून ते वाचले. सावरकरबंधू नाशिक येथे शिक्षण घेत असताना
वि.दा. सावरकरांनी 'राष्ट्रभक्तसमूह' नावाची एक गुप्त संघटना, अण्णा म्हसकर आणि रावजी पागे यांच्या सहकार्याने उभी केली. या
संघटनेचे कार्य म्हणजे, लोकसंग्रह व राजकीय शिक्षणाने मन:क्रांती घडवून आणणे हे होते. पुढे या संघटनेचे नाव वि.दा. सावरकरांनी
'मित्रमेळा' असे ठेवले. या मित्रमेळयाचे लोण महाराष्ट्रभर पसरले.
नाशिकमध्ये ग.दा. सावरकरांनी, वि.दा.सावरकर व ना.दा.सावरकर यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती. माध्यमिक
शाळेतील डॉक्टरांचे दिवस, बालपणातील शिक्षणाची सुधारलेली आवृत्ती होती. स्वदेशी चळवळ, रामदासी उत्सव, हिंदू-
मुसलमानांच्या लढाया हे सर्व होते ते खेळ आणि व्यायाम करत असत. इंग्रजी शाळेत असताना त्यांनी पुणे येथे वक्तृत्वस्पर्धेत
यश मिळविले. 'काळ'कर्ते शि.म. परांजपे यांनी त्यांची पाठ थोपटली. नाशिकलाही त्यांनी बक्षिसे मिळविली. परांजप्यांचा

'काळ' आणि मुंबईच्या 'विहारी' वर्तमानपत्रामध्ये त्यांनी लेखन केले. त्याच वयात त्यांनी शिवचरित्रावर भाषणही दिले होते. पुढे ब्रिटिश सरकारच्या रोषाने ते लिहिलेले भाषण त्यांनी स्नेहयाजवळ ठेवायला दिले आणि पुढे ते जाळून टाकले. 'अभिनव भारत'मध्ये काम करत असताना त्यांना सरकारच्या रोषाला बळी पडावे लागले. दसऱ्याच्या मिरवणुकीत पोलिसाला मारल्याच्या आरोपावरून त्यांना सरकारने अटक केली. १९०७ साली ते मॅट्रिक झाले. पुढे १९०८ मध्ये ते बडोद्याला कॉलेजमध्ये गेले. १९१५ साली त्यांचा शांताबाईशी विवाह झाला. १९१९ साली ते दातांचे डॉक्टर झाले नि १९१७ मध्ये त्यांनी गिरगावात दवाखाना सुरु केला.

**क्रांतिकार्य -**

क्रांतिकार्याचा आढावा घेतला आहे. त्यांनी 'मित्रमेळा' आणि 'अभिनव भारत' या संघटनेद्वारे क्रांतिकार्याचे बाळकडू मिळाले होते. नारायणरावांनी राजकीय क्रांतिकार्यास किशोरांच्या संघटनेतून प्रारंभ केला. ग.दा.सावरकर व वि.दा.सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली नारायणरावांनी आपल्या मित्रांवर आपली छाप बसविली. २७ सप्टेंबर १९०६ रोजी आपल्या सहकाऱ्यांसह रस्त्यावर 'वंदे मातरम' म्हणत चालले असता ग.दा.सावरकर आणि पोलिसांची बाचाबाची झाली. त्यामध्ये डॉ. नारायणराव सावरकरांसमवेत अकरा जणांना पोलिसांनी अटक केली हा खटला खूप गाजला. शेवटी सर्वांची सुटका झाली.

लो. टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ डॉ. नारायण सावरकरांनी कडकडीत हरताळ बडोदा येथे घडवून आणला. १३ नोव्हेंबर १९०९ रोजी लॉर्ड मिंटोवर गुप्त क्रांतिकारकाने बॉंब फेकला. पोलिसांनी नारायण दामोदर सावरकर यांना अटक केली. एका शिक्षकाच्या साक्षीने ते सुटले. वि.दा. सावरकरांनी इंग्लंडहून पाठविलेली पिस्तुले डॉ. नारायण सावरकरांनी दडविली आणि चिथावणीखोर भाषणामुळे नारायण सावरकरांवरही राजद्रोहाचा आरोप ठेवला गेला. परंतु वि.दा. सावरकरांना ५० वर्षे काळया पाण्याची शिक्षा ठोठावली आणि डॉ. नारायण दामोदर सावरकर यांना सहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. ही शिक्षा नाशिक कटाच्या संदर्भात होती.

**वृत्तपत्रीय कार्य -**

सन १९२७ साली 'श्रध्दानंद' नावाने साप्ताहिक सुरु केले आणि ते तीन वर्षे चालविले. या वृत्तपत्राला सावरकरबंधूंच्या तेजाचे एक वलय प्राप्त झाले होते. हे साप्ताहिक त्यांनी १० जानेवारी १९२७ रोजी सुरु केले. या पत्राचे संपादक डॉ. ना.दा. सावरकर होते. एका मुसलमान माथेफिरूने खून केलेल्या शुध्दी चळवळीचे पुरस्कर्ते स्वामी श्रध्दानंद यांचे नाव देणे अपरिहार्यच होते. या पत्राद्वारे त्यांनी भाषाशुध्दी, हिंदु सभेचा प्रचार, शुध्दी संघटन या गोष्टींवर भर दिला. अल्पावधीत श्रध्दानंद हे साप्ताहिक कमालीचे लोकप्रिय झाले होते व त्याचा खपही भरपूर वाढला होता. केसरी, प्रभात, झारापकर, लोकमान्य, भाला या वृत्तपत्रातही त्यांनी लेखन केले.

**राजकीय कार्य -**

लो. टिळकांनी राष्ट्रीय जागृतीसाठी 'गणेशोत्सव' आणि 'शिवजयंती' उत्सव सुरु केले. या सणांना धार्मिक स्वरुप देऊन महाराष्ट्रात एका महान परंपरेला सुरुवात केली. (१८९३) तेव्हापासून गणेशोत्सव, दसरा, दासनवमी व शिवजयंती राष्ट्रीय उत्सव म्हणून महाराष्ट्रात रुढ झाले. १९१९ साली डॉ. ना.दा. सावरकर यांनी रायगडावर जाऊन शिवजयंती साजरी केली.

१ ऑगस्ट १९२० रोजी लो. टिळकांचा मृत्यू झाला आणि राष्ट्रीय सभेची सर्व सूत्रे गांधीजींकडे आली. देशाच्या राजकारणाला एक नवे वळण लागले. १९२० मध्ये आंदोलन झाले. मिठाच्या सत्याग्रहात डॉ. ना. दा. सावरकर यांनी भाग घेतला होता, असे तत्कालीन पोलीस फाईलमध्ये नमूद केले आहे. ३ एप्रिल १९२६ रोजी रायगडावर शिवाजी उत्सव पार पडला, यामध्येही डॉ. ना.दा. सावरकर सहभागी झाले. १९२७ साली शिवाजी महाराजांची त्रिशताब्दी रायगडावर जाऊन त्यांनी साजरी केली. त्यावेळी ना.दा. सावरकर आणि त्यांचे सहकारी डॉ. वेलकर यांनी पत्रक काढून शिवजन्मोत्सव कसा साजरा करावा, हे त्या पत्रकाद्वारे सांगितले. ऐतिहासिक पुरुषापासून प्रेरणा घ्यावी व आपल्या भारत देशास गुलामगिरीतून मुक्त करावे, ही त्यामागची प्रेरणा होती.

लो. टिळकांच्या राष्ट्रीय उत्सवातील धोरणांचा प्रचार करण्यासाठी डॉ. सावरकरांनी नांदुरा, अमरावती, चांदा, वणी, पांढरकवडा, दारव्हा, कारंजा, अकोला, तेल्हारा, वाशीम, उमरखेड, मुसदा, पुसद या ठिकाणी दौरा केला. गांधीजींनी असहकार, अहिंसक चळवळीने अल्पकाळात स्वराज्य प्राप्त करता येईल म्हणून आंदोलन उभारले. या चळवळीला गती देण्यासाठी डॉ. सावरकरांनी टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचा अवलंब करण्याचे कार्य केले. गांधीजींची मते कशी निरुपयोगी आहेत ते त्यांनी जनतेला पटवून दिले. ३० मार्च १९२९ साली भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी हे विचार मांडले. १९३४ पर्यंत डॉ. सावरकर हे काँग्रेसमध्ये होते. गांधीजींबरोबर कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. परंतु पुढे डॉ. नारायणराव सावरकरांनी काँग्रेस सोडल्यानंतर हिंदु सभा या पक्षाद्वारे राजकीय कार्य सुरु केले.

**सामाजिक कार्य -**

१९२४ मध्ये अंदमानच्या बंदिगृहातून वि.दा. सावरकरांची सुटका झाल्यावर त्यांना रत्नागिरी येथे ठेवण्यात आले. त्यांच्यावर ब्रिटिशांची करडी नजर असे. त्यांना राजकारणात भाग घेण्यास ब्रिटिश शासनाची बंदी होती. रत्नागिरीत असताना वि.दा. सावरकरांच्या प्रत्येक समाजकार्याला डॉ. सावरकर साहय करत असत. सावरकरबंधूंनी रत्नागिरीत अस्पृश्यता निर्मूलन चळवळ हाती घेतली. भागोजी शेठ कीर यांनी पतित पावन मंदिर उभारण्यासाठी बरीच मदत केली. सावरकरबंधूंनी अस्पृश्योध्दाराचे कार्य त्या ठिकाणी हाती घेतले. पतित पावन मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यास सावरकरबंधूंचा वाटा मोठा होता. डॉ. सावरकरांचा शुध्दी चळवळीत देखील मोठा वाटा होता. परधर्मात गेलेल्या व्यक्तीला परत आपल्या धर्मात शुध्दीकरण चळवळीद्वारे घेतले जाई. त्या काळी टाकलेले अत्यंत धाडसी पाऊल होते. सार्वजनिक उत्सव, अस्पृश्यता निवारण, शुध्दी चळवळ, गोवर्धन संस्था, अनेक परिषदा, कामगार सभा, झुणका-भाकर आंदोलने अशा अनेक चळवळीत भाग घेतला.

**साहित्यिक कार्य -**

डॉ. नारायणराव सावरकरांनी लिहिलेले 'हिंदूंचे पुराण आणि प्राचीन इतिहास' याची काही कात्रणे त्यांचे पुत्र श्रीहर्ष सावरकर यांच्याकडे सापडली. भारताबाहेरही आर्यांनी साम्राज्ये निर्माण केली अशी लेखमाला त्यांनी 'प्रभात'मधून लिहिली. भारताने एकेकाळी

"Education through self-help is our motto" - Karmaveer

Rayat Shikshan Sanstha's

# Maharaja Jivajirao Shinde Mahavidyalaya,

Shrigonda, Tal. Shrigonda Dist. Ahmednagar

Accredited with CGPA of 2.93, Grade B

## State Level Seminar

**2nd & 3rd February, 2018**

# ★ CERTIFICATE ★

is is to certify that,

rof./Dr. जगदाळे मनिषा माणिकराव.

f भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे.

as participated / as a Resource person / presented a paper

n "कर्मवीर भाऊराव पाटलांचे शैक्षणिक कार्य." in the state level

minar on "Local history and it's importance"

onsored by Savitribai Phule Pune University (BCUD), Pune.

| | | |
|---|---|---|
| **Prof. S.S. Pawar** | **Prof. R. N. Thorat** | **Dr. D.K. Mhaske** |
| Co-ordinator | Convener | Principal |